# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 17/04/2021 (शनिवार)

(सकाळ)

---

### जबरी चोरी

पो.स्टे. बोरी :– अंतर्गत 12 कि.मी अंतरावर विलेज बियर बार बुटीबोरी ते वर्धा रोड सावंगी आसोला येथे दि. 15/04/2021 चे 22.00 वा. सुमारास फिर्यादी नामे– संभाजी उर्फ राजु मारोती कांबळे वय 55 वर्षे रा. सावंगी आसोला ता. हिंगणा जि. नागपुर हे मुकेश जयस्वाल यांचे विलेज बियर बार मध्ये मॅनेजर आहेत. फिर्यादी व बियर बार मधील नौकर बार बंद करून झोपले व 23.00 वा. लघुशंका करीता उठुन बाहेर निघाले असता एका पांढ–या रंगाचे स्विफ्ट डिझायर कार क्र. एमएच–49/एफ– 1670 मधील 2 आरोपी पैकी एक पप्पु नावाचा इसम रा. वर्धा यांनी संगनमत करून फिर्यादी व इतर नौकरांना चाकुचा धक दाखवुन, बारचे गोडाऊन मध्ये ठेवलेल्या विदेशी दारू पैकी विदेशी दारूच्या एकुण 40 पेटी किं. 2,42,500/–रू. चा मुद्देमाल जबरीने त्यांचे कारचे डिक्की, मागील सिटचे भागावर टाकायला लावुन जबरीने चोरी करून कारने पळुन गेले. तपासा दरम्यान यातील आरोपी नामे क्र. 1) पप्पु उर्फ रफिक लतिफ शेख, वय 35 वर्ष, रा. वार्ड क्र. 5 एलआयसी कॉलनी, नालवाडी जि. वर्धा, 2) सोनु उर्फ मोसीन हुसैन खान, वय 36 वर्ष, रा. वार्ड क्र. 26 फुलफैल जि. वर्धा यांना अटक करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 392, 34 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री आशीष मोरखेडे पो.स्टे. बोरी मो.क्र. 8208751249 हे करीत आहे.

### अपघातात मृत्यू

1) पो.स्टे. कुही :– अंतर्गत 03 कि. मी. अंतरावरील कुही मांढळ रोड चिपडी शिवार येथे दिनांक 04/04/2021 चे 00:49 वा. दरम्यान आरोपी/मृतक नामे– धम्मा युवराज अडकोणे, वय 26 वर्ष, रा. लोहारा हा दि. 03/04/2021 रोजी रात्री 23.00 वा. पुर्वी त्याचे ताब्यातील एमएच– 40/ बीझेड– 7470 क्रमांकाच्या मोटरसायकलने स्वतः भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवीत कुही मांढळ रोडने मांढळ च्या दिशेने जात असतांना चिपडी वळनावर त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगात रोडच्या काठावर टाकलेल्या मुरूम मातीच्या ढीगावरून उसळल्याने तो रोडवर पडुन गंभीर जखमी होण्यास व स्वतःच्या मरणास आरोपी कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी सर. तर्फे पोहवा नामदेव पुजारी पोस्टे. कुही यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 304 (अ) भादंवी. सहकलम 3(1)/181,184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ वानखेडे 9850492065 हे करीत आहे.

2) पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 16 कि. मी. अंतरावरील सावळी फाटा येथे दिनांक 15/04/2021 चे 19:30 वा. ते 19:45 वा. दरम्यान सुनिल रामुजी शेन्डे वय 36 वर्ष रा. गुमथळा याने त्याच्या ताब्यातील एमएच–40/एइ– 4711 क्रमांकाच्या मोटरसायकलने एमएच–53 रोड ने कंपनीतुन घरी येत असता मौजा सावळी फाटा येथे भंडारा कडुन नागपूर कडे जाणारी गाडी क्र. एमएच–32/क्यु 5643 चा चालक आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन सुनिल शेन्डे याच्या मोटरसायकला मागुन धडक दिली. या अपघातात मोटरसायकल चालक याचे गंभीर जखमी होवुन त्याचा मृत्यु झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– मनोहर काशिनाथ शेन्डे वय 45 वर्ष रा गुमथळा ता कामठी जि. नागपुर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा रविन्द्र बकाल मो.नं. 9823168964 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर